व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट क व गट ड कर्मचा-यांच्या विविध सेवाविषयक बाबींसंदर्भात शासनाकडे करण्यात येत असलेल्या संदर्भांबाबत.

<u>महाराष्ट्र शासन</u>

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण -१११९/प्र.क्र.१३/१९/व्यशि-५

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ एप्रिल, २०१९.

<u>परिपत्रक</u>

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयात/ संस्थांमध्ये कार्यरत गट क/ गट-ड कर्मचा-यांच्या विविध वैयक्तिक सेवाविषयक बाबींशी संबंधित प्रकरणे (नियुक्ती/बदली/वेतन निश्चिती बाबतची प्रकरणे/मानीव दिनांक/स्थायिकरण इत्यादी) शासनाकडे संदर्भ करण्यात येतात. तसेच अनेक गौण स्वरूपाच्या प्रकरणामध्ये शासनाकडून गैरवाजवी मार्गदर्शन मागविण्यात येते. अनेकदा गट क/ गट-ड मधील कर्मचारी थेटरीत्या शासनाकडे व्यक्तिशः उपस्थितीद्वारे वा पत्रव्यवहाराद्वारे दाद मागतात. यामुळे शासन स्तरावर अकारणपणे वेळेचा अपव्यय होतो, तसेच प्रकरण निकाली काढण्यामध्ये देखील कालापव्यय होतो.

२. शासनाचा प्रशासकीय विभाग म्हणून या विभागाकडून आदेश/ सूचना दिल्या जातात. त्याद्वारे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रशासकीय कामकाज चालविणे अभिप्रेत आहे. शासन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आहे. एखाद्या मुद्यावर कोणत्याही मार्गदर्शक सूचना नसतील तर त्यावेळी शासनाकडे संदर्भ केल्यास ती बाब समजून घेता येईल. परंतु, अनेकदा प्रचलित नियम/ अधिनियम न तपासता संचालनालयाकडून शासनाकडे संदर्भ केले जातात. त्यामुळे शासन स्तरावर शासनाच्या कामकाजावर विपरित परिणाम होतो.

३. वरील गोष्टींचा विचार करून, क्षेत्रीय कार्यालयातील कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहेत:-

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण तसेच सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय यांना अधिकार प्रदान केलेल्या बाबींसंदर्भातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयात/ संस्थांमध्ये कार्यरत गट क/ गट-ड कर्मचा-यांचे वैयक्तिक सेवाविषयक प्रस्ताव/ संदर्भ शासनाकडे पाठविण्यात येऊ नयेत.

२) सेवा विषयक बाबी विषयी प्रचलित नियम/ तरतुद याबाबत काही मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास निव्वळ त्या बाबी/ मुद्यांचा उल्लेख करून त्या संदर्भातील नियम/ तरतुदींसह शासनाकडे मार्गदर्शन प्रस्ताव सादर करण्यात यावेत. असे प्रस्ताव कार्यालय प्रमुख यांनी प्रथम सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय यांना सादर करावेत. तद्नंतर प्रादेशिक कार्यालयामार्फत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना सादर करावेत. त्यानंतरही शासन स्तरावरील मार्गदर्शनाची आवश्यकता भासल्यास असे प्रस्ताव संचालक स्तरावरून शासनास सादर करण्यात यावेत.

कोणत्याही परिस्थितीत कर्मचा-याच्या वैयक्तिक नावाने प्रस्ताव सादर करू नयेत.

३) ज्या बाबींसंदर्भात संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण तसेच सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत फक्त अशा बाबींसंदर्भातील प्रस्ताव सविस्तर विवेचन व कागदपत्रांसह सादर करण्यात यावेत.

४) बऱ्याच वेळा असे आढळून येते की, मा.औद्योगिक/ कामगार न्यायालय/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा मा. उच्च न्यायालयात बाजू न मांडल्यामुळे न्यायालयामार्फत एकतर्फी निर्णय दिला जातो. यास्तव, प्रतिज्ञाप्रत्राद्वारे तसेच वकीलांमार्फत प्रशासनाची बाजू योग्यप्रकारे मा.न्यायालयासमोर मांडली जात आहे ना याचा आढावा घेण्यात यावा. न्यायालयीन प्रकरणांबाबत निष्काळजीपणा निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करून, कारवाई करण्याकरिता विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी.

५) मा. न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात एकतर अपील/ पुनर्विलोकन याचिका दाखल करणे अथवा त्या आदेशाची अंमलबजावणी करणे असे दोनच पर्याय समोर असताना मा.न्यायालयाच्या आदेशाची योग्य ती दखल विहीत कालावधीत घेतली जात नाही. पर्यायाने अवमान याचिकांची संख्या वाढते आहे. त्यामुळे मा. न्यायालयाच्या आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी/ अपील/पुनर्विलोकन न करणा-या अधिकारी/ कर्मचा-यांवर तात्काळ जबाबदारी निश्चित करून, कारवाई करण्याकरिता विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी.

६) अशा प्रकारे संचालनालय/ प्रादेशिक कार्यालय स्तरावर कार्यवाही विहित कालावधीत न झाल्यामुळे सचिवांच्या नावाने अवमान याचिका झाल्यास संबंधित अधिकारी यांना याबाबत जबाबदार धरून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल व याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेतली जाईल.

यापुढे वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०४०२१६१५३९२६०३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=34e795101cfc08377272f409bc9348c5d84ec89bc33bd49bcb71e896a5e56b29, serialNumber=eb1cb39de10fe09852a24a5fa63add6d5b204146d3716e740e20fb4b2a378a55, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2019.04.02 16:20:53 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर (संचालनालयामार्फत)
३. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (संचालनालयामार्फत)
४. सर्व प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संचालनालयामार्फत)
५. सर्व मुख्याध्यापक, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/ केंद्र (संचालनालयामार्फत)
६. निवड नस्ती (व्यशि ५)